# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.04.2026** **वारः बुधवार**

---

1. तमिळनाडू विधानसभेच्या एकाच टप्प्यासाठी आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उद्या मतदान
2. भारत आणि जर्मनी यांच्यात संरक्षण क्षेत्रातलं सहकार्य अधिक वृद्धिंगत व्हावं-संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचं प्रतिपादन
3. जम्मू आणि काश्मीरमधल्या पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आज एक वर्ष पूर्ण
4. इराणबरोबरची शस्त्रसंधी अनिश्चित काळासाठी वाढवण्याची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा आणि
5. ISSF कनिष्ठ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या शिवा नरवाल याला सुवर्णपदक

**<u>निवडणुका</u>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान उद्या 23 एप्रिलला होणार आहे. यामध्ये 16 जिल्ह्यांतील 152 जागांसाठी मतदार कौल देतील. एक हजार चारशे 78 उमेदवारांचं भविष्य उद्या मतपेटीत बंद होईल. राज्यात भयमुक्त, निष्पक्ष आणि शांततापूर्ण वातावरणात मतदान पार पडावं यासाठी निवडणूक आयोगानं दक्षता घेतली आहे. राज्यात दुसऱ्या टप्प्यातलं मतदान 29 एप्रिल रोजी होणार आहे.

तर दुसरीकडं तामिळनाडूमध्ये उद्या एकाच टप्प्यात 234 विधानसभा जागांसाठी मतदान होणार आहे. राज्यातील पाच कोटी 73 लाख 43 हजार मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील. दरम्यान, महाराष्ट्रात बारामती आणि राहुरी या दोन विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठीचा प्रचार काल संपला.

दोन्ही मतदारसंघात उद्या मतदान होणार आहे. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी काल राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांची प्रचारसभा झाली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीतील वरिष्ठ नेते तसंच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे देखील प्रचार सभेला उपस्थित होत्या. दरम्यान प्रकृती अस्वास्थ्यामुळे आपण मुंबईबाहेर जाऊ शकत नसून नाईलाजास्तव मतदानाचा हक्क बजावता येणार नाही, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

सरकारच्या योजना आणि धोरणांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचवण्यात नागरी सेवांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे असं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी केलं. नागरी सेवा दिनानिमित्त काल नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सरकारच्या यशात नागरी सेवा अधिकारी, कर्मचाऱ्यांचं समर्पित वृत्तीनं केलेलं काम महत्त्वाचे ठरते. दिल्लीत योजना आखल्या जाऊ शकतात परंतु त्या दूरवरच्या खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचण्यासाठी त्या योग्य पद्धतीनं राबवल्या जाणं आवश्यक आहे. नवनव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करुन नागरी सेवा अधिकाऱ्यांनी आपलं काम दुर्गम भागातही पोहोचेल यासाठी प्रयत्न करावेत असं आवाहन राधाकृष्णन यांनी केलं.

**<u>नागरी सेवा दिन</u>**

राज्यातील प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी झिरो ब्युरोक्रसीची संकल्पना राबवण्याचा निर्धार काल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नागरी सेवा दिनानिमित्त आयोजित राजीव गांधी प्रशासकीय गतीमानता- प्रगती अभियानाच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते काल मुंबईत बोलत होते. सुलभ प्रक्रिया, पूर्वानुमान आणि मानवी हस्तक्षेप कमी करुन पात्र नागरिकांना थेट सेवा देणं हेच झिरो ब्युरोक्रसी'चं मूळ तत्त्व आहे. झिरो

ब्युरोक्रसी म्हणजे अधिकारी नसणे नव्हे, तर प्रक्रियांची पुनर्रचना करुन त्या अधिक सुलभ आणि पारदर्शक करणं आहे असं मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

**राजनाथ-जर्मनी**

आत्मनिर्भर भारत हा उपक्रम निर्मिती, विकास आणि नवकल्पना या क्षेत्रातील सहकार्यासाठीचे आमंत्रण असून, भारत आणि जर्मनीचं संरक्षण उद्योग परिसंस्थेमधील सहकार्य अधिक वृद्धिंगत करावं अशी अपेक्षा संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केली. संरक्षण मंत्री तीन दिवसांच्या जर्मनी दौऱ्यावर गेले असून, त्यांनी काल जर्मन संसदेच्या संरक्षण आणि सुरक्षाविषयक संसदीय स्थायी समितीला संबोधित केलं. त्यावेळी ते बोलत होते. आजघडीला जग नव्या संरक्षण संकटाला तोंड देत असून, तांत्रिक परिवर्तनामुळे सद्यपरिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची आणि परस्परांशी जोडली गेली आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीशी जुळवून घेणारा नवा दृष्टीकोन ही आजच्या काळाची गरज असल्याचं राजनाथ सिंग यांनी नमूद केलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाअंतर्गत भारतीय संरक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडत असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. भारत-जर्मन उद्योगांतील वाढत्या भागीदारीतून उभय देशांना परस्पर लाभ मिळतील असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**पहलगामहल्ला**

जम्मू आणि काश्मीरमधल्या पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आज एक वर्ष पूर्ण होत आहे. गेल्या वर्षी याच दिवशी पहलगाम इथं दहशतवाद्यांनी 26 निरपराध लोकांची हत्या केली होती, यामध्ये प्रामुख्यानं पर्यटकांचा समावेश होता. जगभरातील अनेक देशांनी या घृणास्पद कृत्याचा तीव्र शब्दांत निषेध केला होता. या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सशस्त्र दलांनी गेल्या वर्षी 6 आणि 7 मेच्या मध्यरात्री 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत नियंत्रण रेषेच्या पलीकडं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधल्या दहशतवाद्यांच्या नऊ छावण्यांवर अचूक मारा केला. या कारवाईत शंभरहून अधिक दहशतवादी ठार झाले.

**पश्चिम आशिया**

इराणसोबतची शस्त्रसंधी अनिश्चित काळासाठी वाढवण्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धसंघर्ष संपवण्यासाठी आणि दोन्ही देशांना शांतता चर्चा सुरू ठेवता यावी, यासाठी हा निर्णय घेतल्याचं ट्रम्प यांनी सांगितलं. मात्र इराणच्या बंदरं आणि किनाऱ्यांवरील अमेरिकी नौदलाची नाकेबंदी सुरूच राहील असंही त्यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, अमेरिकेनं इराणशी संबंधित 14 व्यक्ती, संस्था आणि विमानांवर निर्बंध लादले आहेत. तर दुसरीकडं अमेरिकी सैन्यानं हिंद महासागरात निर्बंध घातलेल्या 'एम/टी तिफानी' हे तेलवाहू जहाज ताब्यात घेतलं आहे. हे जहाज इराणच्या कच्च्या तेलाच्या तस्करीमध्ये सहभागी असल्याचं पेंटागॉननं म्हटलं आहे.

**संरक्षणदल प्रमुख**

सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी ब्रिटनच्या संरक्षण क्षेत्रातील उद्योगपतींची काल भेट घेतली. यावेळी दोन्ही देशांमध्ये संरक्षण क्षेत्रातील सहकार्याला चालना देण्यावर भर देण्यात आला. संरक्षण औद्योगिक सहकार्यामुळे महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानाच्या सह-रचना, सह-विकास आणि सह-उत्पादनाला चालना मिळेल, संरक्षण उत्पादन, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि पुरवठा साखळीच्या लवचिकतेमध्ये अधिक सुलभ सहकार्य शक्य होईल, असंही त्यांनी सांगितलं. जनरल चौहान यांनी ब्रिटनच्या इंडो-पॅसिफिक राज्यमंत्री सीमा मल्होत्रा यांचीही भेट घेतली. जनरल चौहान यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय लष्करासमोरील आव्हानं आणि संधी या विषयावर एक गोलमेज परिषदही झाली.

**नौदल-सुनयना**

भारतीय नौदलाचं INS सुनयना जहाज काल इंडोनेशियाची राजधानी जकार्ता इथं दाखल झालं. हिंद महासागर क्षेत्रात करण्यात आलेल्या या मोहिमेदरम्यान, या जहाजाचा हा तिसरा बंदर-भेट कार्यक्रम आहे. या सागरी गस्ती जहाजावर 16 मित्र-राष्ट्रांमधील नौसैनिकांचा समावेश आहे.

**केदारनाथ**

चारधाम यात्रास्थळांपैकी एक, उत्तराखंड राज्यातील रुद्रप्रयाग इथल्या केदारनाथ धामचे दरवाजे भाविकांसाठी आज उघडण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी विशाल मिश्रा यांनी यात्रेसाठी चोख व्यवस्था कऱण्यात आल्याचं म्हटलं आहे. तर चारधाम यात्रेतील तीर्थक्षेत्र श्री बद्रीनाथ धामचे दरवाजे उद्या उघडले जाणार आहेत.

**केरळ-स्फोट**

केरळ राज्यातल्या त्रिशूर जिल्ह्यातील मुंडाथिकोड इथं फटाका कारखान्यात स्फोट होऊन 13 जण मृत्युमुखी पडले आहेत. रविवारी तामिळनाडूच्या विरुधुनगर इथल्या एका फटाका निर्मिती कारखान्यात झालेल्या स्फोटात 25 जणांचा बळी गेल्यानंतर, अवघ्या दोन दिवसांत ही दुर्घटना घडली आहे.

**क्रिकेट-महिला**

भारत आणि दक्षिण अफ्रिकेच्या महिला क्रिकेट संघांदरम्यान सुरू असलेल्या पाच टी-20 सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना आज जोहान्सबर्ग इथं खेळला जाणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री साडेनऊ वाजता सामना सुरू होईल. या मालिकेत दक्षिण अफ्रिकेचा संघ 2 विजयासह आघाडीवर आहे. मालिकेतला चौथा सामना शनिवारी तर अंतिम सामना सोमवारी होणार आहे.

**नेमबाजी**

इजिप्तमधील कैरो इथं सुरू झालेल्या ISSF कनिष्ठ नेमबाजी विश्वचषक 2026च्या पहिल्याच दिवशी काल पुरुषांच्या 10 मीटर एअर पिस्तूल नेमबाजी स्पर्धेत शिवा नरवाल यानं सुवर्णपदक जिंकून भारताला या स्पर्धेतलं पहिलं सुवर्णपदक मिळवून दिलं आहे. 241 पूर्णांक 8 गुणांची नोंद करत त्याने हे सुवर्णपदक पटकावलं. उझबेकिस्तानच्या सोदिकजोन अब्दुल्लायेव्हनं दुसरं स्थान पटकावलं, तर चिराग शर्मा 218 पूर्णांक 9 गुणांसह तिसऱ्या स्थानी राहिला. तत्पूर्वी, दिवसाच्या सुरुवातीलाच पनाह भुग्रा हिनं महिलांच्या 10 मीटर एअर रायफल स्पर्धेत 250 पूर्णांक 6 गुणांची नोंद करत रौप्यपदक जिंकले आणि या विश्वचषकातील भारताचे पहिले पदक निश्चित केले.

कालच्या या तीन पदकांमुळे, भारत या स्पर्धेच्या पहिल्या दिवसाअखेरीस एक सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य अशा पदकांसह गुणतालिकेत अव्वल स्थानी राहिला. या स्पर्धेत 25 विविध महासंघांचे एकूण 284 खेळाडू सहभागी झाले आहेत.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.